# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**वित्त व लेखा विभाग**

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठास केंद्र व राज्य शासनाकडून तसेच विविध अनुदान संस्थांकडून अनुदान प्राप्त होत असते. प्राप्त अनुदानाअंतर्गत उपकरण खरेदीसाठी करावयाचा खर्च शासनाने दिलेल्या निर्देशानुसार Goverment e Marketing (GeM) या पोर्टलमार्फत करणे सक्तीचे आहे. संबंधित पोर्टलच्या वापरासंदर्भात आवश्यक माहिती वापरकर्त्यांना कळावी या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विभागातील स्टोअर किपर, रुसा २.० अंतर्गत येणारे प्रकल्पप्रमुख व वित्त व लेखा विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शुक्रवार दिनांक १०/०१/२०२० रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० वाजेपर्यंत व्यवस्थापनशास्त्र विभागातील सभागृहात (PUMBA) कार्यशाळा आयोजित केली आहे.

तरी उपरोक्त कार्यशाळेसाठी संबंधित सर्व सेवकांनी उपस्थित रहावे. मा. विभागप्रमुखांना विनंती आहे की, आपल्या विभागातील खरेदी प्रक्रियेत सहभाग असणाऱ्या सेवकांना उपरोक्त कार्यशाळेस उपस्थित रहाण्यास सांगावे.

(सीए अतुल पाटणकर)
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पणे-४११००७
**जा.क्र.:** वित्त/२०१९-२०/ १५३१
**दिनांक :** ०७/०१/२०२०

**प्रति :**

१. मा. सर्व विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पणे-७
२. केंद्रित/विकेंद्रित वित्त शाखा प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पणे-७